**<u>नि.फौ.ख.क्र.६०९/२०२३</u>**
शासन–वि–तानाजी.
**नि.क्र.३६.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – बाळू विठोबा चोरमले,
वय – ४० वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार,
राहणार– यवत पोलीस स्टेशन , ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. मी दि. ०२.०३.२०२३ रोजी यवत पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून नेमणूकीस होतो. सदर दिवशी गु.र.क्र. २३०/२०२३ भा.दं.वि. कलम ३२४, ४५२, ५०४, ५०६ अन्वये दाखल होऊन त्याचा तपासकाम माझ्याकडे देण्यात आला. तपासकामासोबत फिर्यादी जबाब, ऑकरन्स रिपोर्ट आणि फिर्यादीचे वैद्यकीय कागदपत्र देण्यात आले. आता मला दाखविण्यात आलेला ऑकरन्स रिपोर्ट तोच आहे. त्यावर एपीआय लोखंडे साहेबांची सही आहे, जी मी माझे सहकारी असल्यामुळे ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. ३७</u>** देण्यात येते. तपासकामात कागदपत्रांचे अवलोकन करुन दुस–या दिवशी दि. ०३.०३.२०२३ रोजी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. फिर्यादीने घटनास्थळ दाखविले होते जे मौजे बोरीपारधी, चौफुला, धायगुडेवाडी येथील डॉ. शेंडगे यांचे जुने नर्सिंग होम या बिल्डींगच्या तळमजल्यावर मेडीक्लेमचे वेटींग रुमचे काम चालू होते. त्या ठिकाणी फिर्यादीने तिला मारहाण झालेल्या फायबरचे निळ्या रंगाचे एक इंच साईजचे पाईपचे आठ तुकडे दाखविले, जे मी दोन पंचांसमक्ष पंचनामा करुन जप्त केले. फायबरचे तुकडे पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेले वस्तु क्र. अ वरील प्लास्टीक पाईपचे आठ तुकडे तेच आहेत ज्याने फिर्यादीला मारहाण झाल्याचे तिने कथन केले होते. सदरचे तुकडे ठेवलेल्या पाकीटावर माझी व पंचांच्या सहींचे लेबल आहे. आता मला दाखविण्यात आलेला नि. ३१ वरील जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर जप्त मुद्देमाल कारकूनकडे जमा करुन त्याची मुद्देमाल पावती फाडली. आता मला दाखविण्यात आलेला मुद्देमाल पावती तीच आहे. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. ३८</u>** देण्यात येते. त्यानंतर चार साक्षीदारांकडे चौकशी करुन त्याची तपास टिपणे नोंदविली. आरोपीने अटकपूर्व घेतल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये हजर झाल्यानंतर नॉमीनल अटक करुन त्यास जामीनावर सोडले. आता मला दाखविण्यात

आलेला अटक फॉर्म व जामीन कदबा तोच आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ३९** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो, आज कोर्टात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीला ओळखलेले आहे. माझ्या तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. गिरमकर यांच्यामार्फतः-**

२. मी घटनेच्या पुर्वी २०१९ वर्षांपासुन यवतच्या अंतर्गत केडगाव चौकीला कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला घटना घडली त्या परिसराची चांगली माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो त्यावेळी फिर्यादी तिथे हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालाच्या लखोटयावर फक्त सीलची तारीख आहे. जप्तीची तारीख नाही. साक्षीदार म्हणतो, ज्या दिवशी जप्त केले त्याच दिवशी सीलबंद केले. हे म्हणणे खरे आहे की, नि. ३८ वरील मुद्देमाल पावती मी बनवलेली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. ३८ वरील पावतीनुसार मुद्देमाल दि. ०२.०३.२०२३ रोजी जप्त करण्यात आलेला आहे. मी घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज चेक केलेल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल ही नळाची फायबरचे पाईपचे तुकडे असून ती वजनाला हलके आहेत. जप्त मुद्देमालसारखी पाईप बाजारात सहजरित्या उपलब्ध होते याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर ५-६ दिवसाच्या विलंबाने फिर्याद देण्यात आली होती. विलंबाचे कारण म्हणजे ते ५-६ दिवस फिर्यादी हॉस्पीटलमध्ये उपचार घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी उपचार घेत असल्याबाबत मला फक्त कागदपत्रांवरुन कळाले. साक्षीदार म्हणतो, मी त्या दवाखान्यात देखील गेलो होतो. फिर्याद दाखल होण्यापूर्वी फिर्यादी ज्या दवाखान्यात दाखल होती तेथे मी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्धवट तपासकाम करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- १९.०८.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.